Vol 5 Issue 10 April 2016 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.oldgrt.lbp.world**

ISSN: 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume - 5 | Issue - 10 | April - 2016

Golden Research Thoughts

# संत जनाबाई – एक व्यापक दृष्टिकोन

वर्षाराणी भोसले
M. A. – मराठी
मु. सा. काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर, ता. बारामती, जि. पुणे.

*प्रस्तावना : –*

महाराष्ट्रा भूमी ही शूर–वीरांची, साधू–संतांची, शिक्षण महर्षीची अशा या पवित्र भूमीत अनेक थोर संत होऊन गेले. त्यापैकी एक थोर स्त्री संत जनाबाई या होय.

13 व्या शतकात परभणी जिल्हयातील गंगाखेड गावी जनाबाईचा जन्म झाला. दमा आणि करूंड या शुद्र दांपत्याचे जनी हे एकुलते एक अपत्य होते. विठ्ठल भक्तीमुळे त्यांना जनाबाई प्राप्त झाल्या होत्या. काही दिवसांनंतर जनाबाईला दामाशेठ यांच्याकडे स्वाधीन केले. त्यानंतर जनाबाई नामदेवांच्या घरी राहू लागल्या. लहानपणापासून त्या उपेक्षित व पोरकेपणाचे जीवन जगल्या होत्या. संसारापासून त्यावंचित होत्या. प्रपंचाचे सुख त्यांना लाभले नाही संत जनाबाईंनी त्यांच्या उपेक्षित जीवनाचा त्याग करून अध्यात्मिक जीवन संत नामदेवाच्या छत्रछायेत व्यतीत केले.

संतांच्या पावलांवर पाऊल टाकून काही संत महिला पुढे आल्या. संत मुक्ताबाई, संत बहिणाबाई, संत कान्होपात्रा, संत जनाबाई, संत मीराबाई इत्यादी महिलो संतांची कामगिरी महत्तवपूर्ण ठरली. त्यातील एक महत्त्वाचा संत म्हणून संत जनाबाईकडे पाहिले जाते. त्यांनी रचलेले अभंग, ओव्या घराघरातून ऐकायला मिळतात. त्यांनी ज्ञानाचे दार सर्वांसाठी उघडे केले. संस्कृतीमधील ज्ञान बोळीभावेमधून सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचविले आणि नामस्मरणासाठीचा सोपा मार्ग सामान्य जनतेला दाखविला.

जनाबाईंनी आपले सर्वस्व त्यागून निःस्वार्थ भावनांनी सामाजिक सेवेसाठी स्वतःला झोकून दिले आहे व समानप्रबोधनाचे महत्त्वपूर्ण काम केले आहे. त्यासाठी त्यांना खूप कष्ट करावे लागले. काही धार्मिक तत्ववेत्यांचा छळही सहन करावा लागला. बालपणातल्या नामदेवाला खेळवता खेळवता नामदेवांच्या अवती–भोवती वावरताना विठ्ठलाच्या सुगुण मूर्तीवर लोभावली ज्यांच्याजवळ सगळी सुख दुखः सांगता येतील असे एक आपले माणूस तिला विठ्ठलातच सापडले.

जनाबाई या एकाच वेळी श्रेष्ठ संत आणि श्रेष्ठ कवयित्री ह्यांचा प्रत्यय आपल्याला त्यांच्या विठ्ठल भक्तीवर अभंगातून दिसून येते.



"पुंडलिक भक्तिबळी | विठो आणिला भूतळी |
टनंत अवतार केवळ | उभा विटेवरी सकळ"

या अभंगातून विठ्ठल व भक्तांचे नाते दृढ आहे यांचे योग्य उदाहरण सांगितले. परमेश्वर आपल्या भक्तांसाठी या भूतलावर अवतार धारण करतात. पुंडलिक हा विठ्ठल भक्त होता आणि त्याने परमेश्वराला भूतळी आणले आणि हा विठ्ठल सुफल भक्तांसाठी गेली अठ्ठावीस युगे कर कटावरी ठेवून उभा आहे.

जनीने विठ्ठलासाठी 'आलसखा' असा एक शब्द वापरलेला आहे. जनीने झाडलोट केली की विठ्ठलाने केर भरून टाकावा. जनीने झाडलोट की, विठ्ठलाने केर भरून दूर टाकावा. जनीने साळी कांडायला काढल्या की विठ्ठलाने हात लावावा. पाणी भरावे, दळण दळावे अशा सगळ्या कामात विठ्ठल मदत करीत असे.

''माझे जनीला नाही कोणी । म्हणूनी देव घाली पाली ।।
जनी सांगे सर्व लोका । न्हाऊ घाली माझा सखा ।।

असे अपूबाईंचे कौतुक जनीने आलसख्याकडून करवून घेतलेले आहे.

जनाबाईंची अभंगसंहिता म्हणाले ईश्वरी सहवासाने रंगलेले शब्दांकित जीवन आहे. वात्सल्यता, कोमलता, सहनशीलता, भावनात्मकता, त्यागवृत्ती असा सर्व स्त्री हृदयाचा उत्कट कामव्ययय अविष्कार मराठी साहित्यात उठून दिसून येते. जनाबाई आपले स्त्रीपण जपताना दिसतात. ''स्त्रीजन्म म्हणोनी न व्हावे उदास।।'' असे जनाबाई सांगतात व संपूर्ण समाजातील सर्व स्त्री वर्गाला एक आत्मविश्वास दिला. जनाबाईच्या व्यक्तिमत्वाचे प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे त्यांना आपल्या स्त्रीतत्वाला विसर पडलेला दिसत नाही किंवा डोईजड होत नाही. ईश्वर प्राप्तीपेक्षा ईश्वरप्रीतीला अधिक महत्व दिले आहे.

।। अरे विठया विठया मूळ मायेच्या कारट्या ।।

संत जनाबाई विठ्ठलाला आईने चिडून मुलाला करट्या म्हणावे तसे संबोधतात. जाती निरपेक्ष धर्मदृष्टी समाजातील प्रत्येक व्यक्तीमध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न केला. परमेश्वर ही जात–धर्म न पाहता भक्ताचे काम व भक्ती या गोष्टी पाहतो. जनाबाई म्हणतात श्री क्षेत्र पंढरपूर हेच माझे माहेर आहे.

बाप रखुमाबाई वर । माझे निजाचं माहेर ।।
ते हे जाणा पंढरपूर । जग मुक्तीचे माहेर ।।

त्याचप्रमाणे ''विठो माझी लेकुरकुळा । संगे लेकुरांचा मेळा'' या अभांगातून सर्व संतांना अंगाखांद्यावर खेळवणाऱ्या विठ्ठलाचे सुंदर चित्रण दिसून येते.

विठ्ठलावरील प्रेम जनाबाईंनह अगदी साध्यासोप्या प्रसंगातून व घरगुती भाषेतून प्रगट केले आहे. त्याचप्रमाणे कौटुंबिक गरजा भागविणासाठी कबाडकष्ट करणारी, हिंदू धर्माची सांस्कृतिक ठेवा प्राणपणाने जतन करणारी स्त्री ही जनाबाईच्या अभंगातून स्पष्टपणे दिसून येते. म्हणूनच स्त्रीयांच्या हृदयपटलावर जनाबाईंचे स्थान अनन्यसाधारण असे आहे.

जनाबाईंचे नामदेव गुरू आहेत आणि जनाबाई स्वतःला त्यांची दासी म्हणून घेत आहे. परमेश्वर प्राप्तीचा साधा व सोपा मार्ग म्हणजे परमेश्वराचे नामस्मरण करणे हा आहे असे त्या सांगतात. परमेश्वराच्या नामस्मरणामुळे जीवनाचा उच्चार होतो. तसेच दैनंदिन कामातून भक्तीचा मार्ग हा अतिशय चांगला असे जनाबाई सामान्य जनतेला सांगतात.

नामदेवांच्या लौकिक जीवनाशी एकरूप झाल्या.
''सण दिवाळीचा आला । नामा राऊळीसी गेला ।।
ळाती धरूनी देवासी । चला आमुच्या घरासी ।।

संत जनाबाई सामान्य जनतेला सांगतात. संत संगती धरा संतामुळे परमेश्वराच्या साक्षात्काराची जाणीव होते. देव संतांच्या माध्यमातून भक्ताकडे पाहते म्हणून संतसंगती धरावी असे जनाबाई म्हणतात.

संत जनाबाई केवळ अभंग रचनाच केली नाहीत. रूपळे, मराठी कवितेचे पदे, कुटे, आरती, पाळणा, व जात्यावरील ओव्या यांचीही रचना केली.

''सुंदर माझे जाते ग फिर भेवते' त्याचप्रमाणे ''धारिला पंढरीचा चोर'' इ. रूपळे आपल्या काव्यात्म प्रकृती आपले लक्ष वेधून घेतात.

त्याचप्रमाणे ज्याला संत सहवास लाभला त्याची जीवन कला पालटले. संतांमध्ये ज्ञानेश्वराला ती श्रेष्ठ स्थान देते. संत चिंतनात आपले मन सुखावले असे जनाबाई म्हणाले.

जनाबाईंची कवीना रसाळ आणि भावमधूर आहे. जनाबाईंची साहित्य निर्मिती ही खूप श्रेष्ठ दर्जाची आहे. तर जनाबाईंचे ब्रीदवाक्य होते. – दलिता कांडिता। तून गाईने अनंता। '' डोईचा पदर आला खांद्यावरी सख्या बाजारी जाईन मी, हाती घेईन टाळ खांद्यावरती वीणा आता मला मना कोण करी देहाचा अहंभाव ठार मारला तरच देवाची प्राप्ती होईल असे जनाबाईंना सुचवायचे आहे.

संत जनाबाई या संत कवयित्री म्हणून जन माणसात लोकप्रिय आहेत. त्यांच्या अभंगामध्ये वेगळेपणा जाणवतो. त्यांच्या काव्याची भावाशैली इतर संतसाहित्याला वेगळी आढळते. साधी, सरळ, प्रवाहित अशी भाषा आढळते. सामान्य वाचकाला सहन समजेल अशी आहे. तसेच त्यांतील ज्ञानही त्यामुळे सहजपणे समजू शकते. अतिशय अल्प भाषा दिसून येते. लौकिक व्यथावेदनांचे कथन त्यांच्यात त्यांच्या अभंगातून दिसते. बोलीभाषेचा वापर आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेला जास्त भावते व त्यांना चांगला परिणाम दिसून येतो. सामान्यातील सामान्य लोकांना समजणाऱ्या बोलीभाषा व ग्रामीण भाषा यांचा वापर केल्याने वाचकांनी सहजतेने त्याचा स्विकार केला आहे.

लौकिक व्यक्थावेदनांचे कथ्न त्यांच्या अभंगातून दिसून येते.
''माय मेली बाप मेला । आता सांभाळी विठ्ठला ।।
मी तुसें गा लेकरू । नको मजशी अव्हेरी ।।

अशी भावना परमेश्वराला सांगतात जनाबाईंच्या अभंगाची संपूर्णतः हे देखील महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये आहे. शब्द योजना चैतन्यशीलता,

स्वतंत्रता, कथात्मकथा पाहाावयास मिळते.

म्हणूनच श्रीकृष्ण भक्तीने, साक्षात्कारी प्रतिभेने व सकोमल भाववृत्तीने मराठी कवींना समृद्ध करणारी कवयित्री म्हणून संत जनाबाईंकडे पाहिले जाते. संतांच्या शिकवणीतूनच भारतीय संस्कृतीचा विकास आणि विस्तार घेत गेला. म्हणूनच संतांच्या कार्याचे महत्त्व जागतिकीकरणातही श्रेष्ठ दर्जाचे आहे.

संत जनाबाईंनी लोकशिक्षण व परिवर्तनाने फार मोठे कार्य केले. अंधश्रद्धा पूर करणयाचा प्रयत्न देव हा माणसात आहे असे सांगितले. अभंग गौळणी, भाकडे, रूपक, ग्रंथ, काव्य, यांची मोठी निर्मिती  केली व त्यातून समाजप्रबोधन केले. समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा, सामाजिक विषमता, वर्णभेद यावर कडाडून हल्ला केला. अध्यात्म आणि समाजसुधारणा अशा दोन्ही भूमिका पार पाडल्या.

भारतभूमी संतांच्या आगमनााने पावन झाले आहे. संत हे ज्ञानरूपी दीपगृह असून ज्यांनी ज्ञानाची प्रकाश आत्मसात केला तो धन्य झाला.

अशा प्रकारे जनाबाईंची विठ्ठलभक्ती, नामदेवांच्या लौकिक जीवनाचे दर्शन, संत जनाबाईंच्या अभंगाचे भाषाशैली थोडक्यात माहिती आपण घेतली याचा अभ्यास केला.

थोडक्यात संत जनाबाईंचे योगदान हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

''संत जनाबाईंचा अभ्यास'' आंतरराष्ट्रीय परिषद ''भारतीय संतांचे योगदान'' या पुस्तकाच्या आधाार केला. संपादक – डॉ. स्नेहल तावरे या आहेत.

स्नेहवर्धन प्रकाशन – कृ. 1055.
प्रथमावृत्ती – 8 जानेवारी, 2015 आंतरराष्ट्रीय परिषद मॉरिशस
मुखपृष्ठ – राजेंद्र गिरधारी
अक्षरजुळणी – सॉफ्टवर्ल्ड सर्व्हिसेस, पुणे.
मुद्रणस्थळ – स्मिता प्रिंटर्स, पुणे.
पृष्ठसंख्या – 300
मूल्य – 300/–
1–8.

एकूणच परमार्थाच्या वाटेवर स्त्री म्हणून वाटचाल करताना जनाबाईला दुखः वाट्याला आलेच परंतु तिने आपले आंतरिक सामर्थ्य पणाला लावून पुढील पिढ्यांना मुक्तीची वाट दाखविली व एक आदर्श निर्माण केला.

### संदर्भ ग्रंथ

1. 'जनाबाईचे निवडक अभंग' इर्लेकर सुहासिनी, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे (2008)
2. 'संत कवी आणि कवयित्री : एक अनुबंध' इर्लेकर सुहासिनी, प्रकाशन पुणे (2006)
3. 'वारकरी सांप्रदाय आणि संत साहित्य' : डॉ. शिवाजीराव मोहन कर्मवीर प्रकाशन, पुणे (2008)
4. 'संत कवयित्री जनाबाई – चरित्र, काव्य आणि कामगिरी भिंगारकर दा. बा. मॅजेस्टिक प्रकाशन, मुबंई, (1989)
5. 'मराठी संत कवयित्री' यादव मा. के. स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, (2012)
6. 'संत जनाबाईचे निवडक अभंग' मोहिते, शिवाजीराव, कर्मवीर प्रकाशन पुणे, (2013)

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.www.oldgrt.lbp.world